# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

## ४१२,ई, शिवाजीगर,पुणे ४११ ०१६

२५६५६२३४, फॅक्स २५६५६२३४ E-Mail : ropune.dte@gmail.com


जा. क. विकापु/लेखा-१/१५वा वित्त आयोग/२०१८/ 2039 दिनांक :- 17 MAY 2018

**अत्यंत तातडीचे/कालमर्यादा**

प्रति,

संचालक / प्राचार्य

सर्व अशासकीय अनुदानित पदवी / पदवीका संस्था

विषय :- १५ वा वित्त आयोगास माहिती सादर करण्याबाबत

संदर्भ : १) या कार्यालयाचे पत्र क्र विकापु/लेखा १/१५ वा वित्त आयोग/२०१८/१८२३ दि.२५/४/२०१८

२) मा.संचालक तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे स्मरणपत्र क्र ८/तंशिसं/१५वा वित्त आयोग/२०१८/२६५ दि ११/५/२०१८

या कार्यालयाचे पृष्ठांकित केलेले संदर्भाकिंत पत्र क्र १ पहावे. तसेच या कार्यालयास प्राप्त झालेले संदर्भ क्र २ च्या स्मरणपत्र-१ चे अवलोकन करावे. (सोबत संदर्भ क्र २ ची प्रत जोडत आहे) सदर पत्रात नमूद केल्या प्रमाणे या कार्यालयाच्या अधिपत्याखालील असलेल्या अशासकीय अनुदानित संस्थेतील निवृत्तीवेतन धारकांची सन २०१०-११ ते २०१८-१९ पर्यंतची व सन २०१९-२० ते २०२४-२५ पर्यत सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांची अचूक माहिती या कार्यालयास दिनांक ०२/०५/२०१८ पर्यत विहीत विवरणपत्र क्र ७ मध्ये भरुन हार्ड कॉपी व सॉप्ट कॉपी मध्ये सादर करण्यातबाबत कळविण्यात आले आहे. परंतु काही संस्थांची माहिती अद्याप पर्यत प्राप्त झालेली नाही. ज्या संस्थांनी (पुना कॉलेज ऑफ फार्मसी,पुणे, इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी, मिरज,) माहिती सादर केली आहे ती अपूर्ण असून झालेल्या खर्चाची रक्कम करोडोमध्ये (Expenditure incurred Rs in Crore) दर्शविलेली नाही. त्याच प्रमाणे सन २०१९-२० ते २०२४-२५ पर्यत सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांची माहिती देखील अपूर्ण सादर केलेली आहे. सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांची माहिती वर्षनिहाय संख्या,कर्मचा-यांचे नाव,पदनाम,जन्म दिनांक व सेवानिवृत्तीचा दिनांकासह विवरापत्रामध्ये भरुन सादर करावी. सदरची माहिती वरिष्ठ कार्यालयामार्फत वित्त आयोगास तात्काळ सादर करावयाची आहे. तरी आपल्या संस्थेची बिनचूक माहिती विहित विवरणपत्रात भरुन तसेच सन २०१९-२० ते २०२४-२५ पर्यत सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांची स्वतंत्र यादींची माहिती दिनांक **१९/०५/२०१८** दुपारी ४.०० वोजेपर्यत actt1.ropune@gmail.com या ई-मेंल आयडी वर पाठवून हार्ड कॉपी **हस्त देय** या कार्यालयास सादर करावी. सदरची माहिती ही तात्काळ वित्त आयोगास सादर करावयाची असल्याने **प्रथम प्राध्यान्य** देण्यात यावे. ज्या संस्थांची माहिती नमूद केलेल्या दिनकांपर्यंत प्राप्त न झाल्यास त्या संस्थेचे नाव वरिष्ठ कार्यालयास कळविले जाईल व त्याची सर्वश्री जबाबदारी संस्था प्रमुखांवर राहिल याची नोंद घ्यावी.

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

पुणे

प्रत: प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१

दुरध्वनी-२२६२०६०१, २२६९०६०२,२२६४११५०/५१ फॅक्स नं.२६९२१०२

E-mail desk8@dtemaharastra.gov. http://www.dtemaharashtra.gov.in


**अतितात्काळ**

**स्मरणपत्र-1**

क्र - 8/तंशिसं/15 वा वित्त आयोग/2018/ 265

दि.

**प्रति,**

**सहसंचालक,**

**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,**

**मुंबई/पुणे/औरंगाबाद/अमरावती**

**विषय :- 15 व्या वित्त आयोगास माहिती सादर करण्याबाबत...**

संदर्भ:- 1. शासन पत्र क्र.पंविआ1017/प्र.क्र42/वित्त आयोग कक्ष, दि. 20/04/2018.

2. या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिसं/15 वा वित्त आयोग/2018/286, दि.23.04.2018

उपरोक्त विषयाबाबत संदर्भीय पत्र क्र. 1 नुसार 15 व्या वित्त आयोगाला निवृत्तीवेतन धारकांची माहिती सादर करावयाची असल्याने याबाबत संदर्भीय क्र. 2 अन्वये कळविण्यात आले होते. परंतू अद्याप आपल्या विभागाअर्तगत असलेल्या अशासकीय अनुदानित संस्थांतील निवृत्तीधारकांची माहिती या कार्यालयास अप्राप्त आहे.

तरी केंद्र शासनाच्या दिनांक 18/12/2017 च्या पत्रासोबतच्या प्रश्नावली व मुद्दयांसोबतचे विविरणपत्र क्र. 7 मध्ये आपल्या विभागाअंतर्गत एकूण निवृत्ती धारक व निवृत्ती धारकाना 2010-11 पासून आतापर्यंत प्रदान करण्यात आलेल्या निवृत्ती वेतनाची तसेच 2019-20 ते 2024-25 पर्यंत सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-याची माहिती वित्त आयोगास सादर करावयाची असल्याने आपल्या विभागातील अशासकीय अनुदानित संस्थेमधील सर्व निवृत्तीधारकांची माहिती उपलब्ध करुन ई मेल/स्पीड पोस्ट/ हार्ड कॉपी व सॉप्ट कॉपी मध्ये तात्काळ पाठविण्यात यावी.

(डॉ.अभय वाघ)

संचालक

तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई

प्रत :- अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी.


तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

पुणे.

16 MAY 2018

आवक क्र. 4434